**N.C.R.B** (एन.सी.आर.बी)

**I.I.F.-I** (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

POLICE STATION CHANNI DIST. AKOLA सत्यमेव जयते

1. **District (जिल्हा):** अकोला **P.S.(ठाणे):** चान्नी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0303 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**18/08/2026 21:49

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 18/08/2026

**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 18/08/2026

**Time From (वेळेपासून):** 10:19 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 10:37 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 18/08/2026 **Time (वेळ):** 11:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 014

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 18/08/2026 21:04 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पोलीस स्टेशन चान्नी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सुलभा प्रल्हाद राऊत

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1982

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाप्रवि वाशिम,चान्नी,अकोला,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाप्रवि वाशिम,चान्नी,अकोला,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8329033177

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव मधुकरराव देशमुख | | | 1. हमु बाजोरीया नगर, हिंगणा रोड, पिंपळखुटा ता पातुर,चान्नी, अकोला,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

पो स्टे ला आल्यावर त्वरीत

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 35000 | 35,000.00 |

POLICE STATION, CHANNI DIST. AKOLA

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

35,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद
पोलीस स्टेशन चान्नी जि. अकोला
दिनांक :- १८/०८/२०२६
नांव :- सुलभा प्रल्हाद राऊत, वय - ४४ वर्षे, व्यवसाय - नोकरी, पद- पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वाशिम, मो.नं.८३२९०३३१७७
विभाग वाशिम, मो.नं.८३२९०३३१७७ मी लाचलुचपत प्रतिबंध विभाग वाशिम येथे पोलीस निरीक्षक म्हणुन मी आज रोजी सरतर्फे समक्ष फिर्याद देते की, मी लाचलुचपत प्रतिबंध विभाग वाशिम येथे पोलीस निरीक्षक म्हणुन १२/०६/२०२६ पासुन कार्यरत आहे. दि. १२/०८/२०२६ रोजी लाप्रवि कार्यालय वाशिम येथे कर्तव्यावर हजर असतांना मा. पोलीस अधिक्षक साहेब, लाप्रवि अमरावती यांनी फोनव्दारे माहिती दिली की, तकारदार ईसम नामे श्री. शुभम भगवान थिटे, वय ३० वर्षे, व्यवसाय शेती रा. मळसुर ता.पातुर जि. अकोला यांची लाचमागणी तकार आहे. वरुन मा. पोलीस अधिक्षक साहेब लाप्रवि अमरावती यांनी मला तक्रारदार यांचा फोन नंबर पाठविला. मा. पोलीस अधिक्षक साहेब लाप्रवि अमरावती यांचे आदेशावरुन तक्रारदार यांना संपर्क केला असता तक्रारदार यांनी पातुर येथे येवुन माझी तकार घ्यावी अशी विनंती केल्याने आम्ही लाप्रवि वाशिम घटकाचे स्टाफसह पातुर येथे पोहचुन तक्रारदार यांना भेटलो. तक्रारदार श्री शुभम थिटे यांनी त्यांची लाच मागणी तकार असल्याचे सांगुन थोडक्यात माहिती दिल्याने आम्ही मा. गटविकास अधिकारी, पंचायत समिती पातुर जि. अकोला यांना दिनांक. १२/०८/२०२६ रोजी शासकीय पंच मिळण्याकरीता पत्र देउन दोन शासकिय पंच उपलब्ध करुन घेतले. आम्ही हजर असलेल्या पंचांचा तक्रारदार यांना परिचय करून देवून पंचासमक्ष तक्रारदारास त्यांचे नांव गांव विचारले असता तक्रारदार यांनी त्यांचे नांव श्री.शुभम भगवान थिटे, वय ३० वर्षे, व्यवसाय-शेती रा. मळसुर ता. पातुर जि.अकोला असे सांगून परिचय करून दिला. आम्ही पंचासमक्ष तक्रारदार यांना त्यांची तक्रार सांगण्याचे बोललो असता तक्रारदार यांनी लाचमागणी होत असल्याची तकार तोंडी सांगून लेखी तकार लिहून दिली ती पुढीलप्रमाणे, मी वरील अर्जदार मळसुर या गावचा रहिवासी असुन शेती काम करतो माझी भुमीपुत्र बियर अॅड वाईन शॉपी पांगरा रोड मळसुर या ठिकाणी असुन त्याचे वैध लायसन माइ-याकडे आहे. मला त्या ठिकाणी वाईनबार टाकायचा असल्याने मी एप्रील २०२६ मध्ये राज्य उत्पादक शुल्क विभागाकडे बार परवानगी मिळणे करीता अर्ज केला होता. वरुन त्या विभागाचे पोस्टे चान्नी येथे सत्यता पडताळणी बाबत पत्र आले. त्यामुळे पोस्टे येथील खुपीया देशमुख यांनी मला फोन करून पोस्टे या असे सांगीतले त्यावरून मी माइ-या वडीलांना घेवुन पोस्टे चान्नी येथे आठ ते दहा दिवसांन पुर्वी गेलो तेथील खुपीया देशमुख यांनी मला असे म्हटले की, वाईनबारच्या NOC करीता तुम्हाला ६५,००० हजार रूपये ठाणेदार दराडे साहेब यांना दयावे लागतील. तरच तुम्हाला NOC मिळेल. मी त्यांना सांगीतले की मी ऐव्हडे पैसे देवु शकत नाही. तरी ते ऐकत नव्हते. म्हणुन मी ठाणेदार दराडे साहेब यांना जाऊन भेटलो असता, त्यांनी मला सांगीतले खुपीया देशमुख यांना भेटुन घ्या तेच तुम्हाला सांगतील माइ-याकडे नंतर या. दि.११/०८/२०२६ रोजी सकाळी ०९/१३ मिनीटांनी खुपीया देशमुख यांना फोन करून बाईनबारच्या परवानगी बाबत विचारणा केली असता त्यांनी साहेब ६५००० हजार रूपयाच्या कमी नाही म्हणतात तेव्हडे पैसे तुम्हाला दया लागतील असे म्हटले. या आधी देखील दोन वाईन बार ची NOC देतांना तेव्हडेच पैसे घेतले असे ते म्हणाले. तरी मला पोस्टे चान्नी चे ठाणेदार श्री.दराडे व खुपीया देशमुख यांना ६५००० हजार रूपयाची लाच दयाची इच्छा नाही. त्यांचे व माझे कोणतीही दुश्मनी नाही. तसेच त्यांचे व माइ-या मध्ये कोणताही देणेघेणे चा आर्थिक व्यवहार झालेला नाही. ते मला लाच मागत असल्याने मी आपल्याकडे लेखी तकार देत आहे. त्यांच्यावर कार्यवाही व्हावी हि विनंती." तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवर तक्रारदार यांनी स्वतः, दोन्ही पंचानी व समक्ष म्हणुन मी सुध्दा सही केली. आम्ही तक्रारदार यांना खुपीया देशमुख व ठाणेदार दराडे हे लाचेची मागणी करतात किंवा नाही ? यांची पडताळणी करणे आवश्यक असल्याचे पंचासमक्ष तक्रारदार यांना सांगितले. तसेच लाचमागणी चे तक्रारीची पडताळणी

करण्याकरीता खुपीया देशमुख व ठाणेदार दराडे यांची कधी व कोठे ? भेट होईल अशी विचारणा केली असता तक्रारदार बोलले की, पोलीस स्टेशन चान्नी जि. अकोला येथे भेट होवू शकते. त्यामुळ दि.१२/०८/२०२६ रोजी पडताळणी कारवाई पोलीस स्टेशन चान्नी जि. अकोला येथे करावयाची असल्याने आम्ही सर्व शासकीय ने व तक्रारदार हे त्यांच्या खाजगी चारचाकी ने पातुर येथुन रवाना होवुन ग्राम सस्ती ते चान्नी येथील श्री मुरलीधर राऊत यांच्या शेत शिवाराजवळ जावुन थांबलो. त्याठिकाणी आम्ही तक्रारदार, पंच व स्टाफला सर्व पडताळणी कारवाई संबंधाने सुचना दिल्या. त्यानंतर माझे सुचनेप्रमाणे पोहवा. विनोद मारकंडे यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून कापडी पिशवी मध्ये रेकॉर्डर टाकून कापडी पिशवी तक्रारदाराचे शर्टाचे आतील बाजुस पिन करुन अटकवून दिल्यानंतर तक्रारदार व पंच क्र.१ यांना तक्रारदार यांच्या खाजगी चारचाकी ठाणेदार दराडे व आलोस खुपीया अंमलदार देशमुख दोन्ही पोलीस स्टेशन चान्नी जि.अकोला यांची भेट घेणेकामी पोलीस स्टेशन चान्नी जि.अकोला येथे १५.५१ वा. सुमारास रवाना केले. तसेच पोलीस निरीक्षक, सुलभा राऊत, लाप्रवि वाशिम, पंच क्र.२ व लाप्रवि स्टाफ असे ग्राम सस्ती ते चान्नी येथील श्री राउत यांच्या शेत शिवाराजवळ थांबून राहिलो. १६.०० वा दरम्यान तक्रारदार व पंच क. १ यांना परत येवुन घडलेली हकीकत सांगीतली त्यावरुन पडताळणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार व आलोसे खुपीया अंमलदार देशमुख यांचेत झालेल्या संभाषणा नुसार आलोसे खुपीया देशमुख यांनी तक्रारदार यांना वाईनबारच्या NOC देण्यासाठी लाच रक्कम मागणीचे बोलणे करुन ६५,००० रुपया ऐवजी ५०,००० रुपयामध्ये साहेबाकडुन डन करुन देवू का? असे म्हणुन साहेबासाठी ५०,००० रुपयाची मागणी केली. तक्रारदार यांनी २०,००० रुपया मध्ये करा अशी तडजोड केली असता आलोसे खुपीया देशमुख यांनी तक्रारदार यांना साहेबांना भेटुन घ्या असे सांगीतल्याचे निष्पन्न झाले. वरील प्रमाणे ऐकलेल्या संभाषणावरुन व तक्रारदार यांनी आम्हा पंचा समक्ष केलेल्या विनंती वरुन तक्रारदार यांना तात्काळ गै. अर्जदार ठाणेदार दराडे यांची भेट घेवुन त्यांची पडताळणी करणेकामी पंच क.०१ सह पाठविण्याचे सर्वानुमते ठरवुन या पडताळणीचे वेळी सुध्दा तकारदार व गै. अर्जदार यांच्या मध्ये होणारे संभाषण व्हॉईस रेकॉर्डरद्वारे ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असुन रेकॉर्डींग ही मेमरीकार्डचे फोल्डर क.०२ मधील फाईल मध्ये करणार असल्याचे सांगुन व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून कापडी पिशवी मध्ये रेकॉर्डर टाकून कापडी पिशवी तक्रारदाराचे शर्टाचे आतील बाजुस पिन करुन अटकवून दिल्यानंतर तक्रारदार व पंच क्र.१ यांना तक्रारदार यांच्या खाजगी चारचाकी ने ठाणेदार दराडे यांची भेट घेणेकामी पोलीस स्टेशन चान्नी जि.अकोला येथे दिनांक १२/०८/२०२६ चे १८.३६ वा. सुमारास रवाना केले. तसेच पोलीस निरीक्षक, सुलभा राऊत, लाप्रवि वाशिम, पंच क्र.२ व लाप्रवि स्टाफ असे ग्राम सस्ती ते चान्नी येथील श्री राऊत यांच्या शेत शिवाराजवळ थांबून राहिलो. १९.२४ वा. चे दरम्यान तकारदार शुभम भगवान थिटे व पंच क्र.१ हे तक्रारदार यांच्या खाजगी चारचाकी वाहन ने ग्राम सस्ती ते चान्नी येथील श्री राउत यांच्या शेत शिवाराजवळ परत आले असता, पोलीस निरीक्षक, सुलभा राऊत, लाप्रवि वाशिम यांचे सुचनेप्रमाणे पोहवा विनोद मारकंडे यांनी तक्रारदाराकडील व्हॉईस रेकॉर्डर घेवून बंद केला. व्हॉईस रेकॉर्डर पोलीस निरीक्षक, सुलभा राऊत, लाप्रवि वाशिम यांचेकडे दिला. या पडताळणी वेळी झालेल्या संभाषणा नुसार तक्रारदार यांनी गै. अर्जदार ठाणेदार दराडे यांना भेटुन बोलणी केली असता ठाणेदार दराडे यांनी NOC करीता लाच मागणी संबंधाने बोलणी केली नाही व लाच मागीतली नसल्याचे निष्पन्न झाले आहे. वरील प्रमाणे दोन्ही पडताळणी वरुन आलोसे खुपीया देशमुख यांनी NOC साठी लाच मागणी केली आहे परंतु लाच रक्कम किती याबाबत स्पष्ट ठरले नसल्याने गै. अर्जदार पोलीस अंमलदार देशमुख व गै. अर्जदार ठाणेदार दराडे यांची परत पडताळणी दिनांक १३/०८/२०२६ रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले आहे. दिनांक १३/०८/२०२६ रोजी पडताळणी कारवाई करीता एकत्र जमलो असता मी पडताळणी कारवाई सुरु करण्यापुर्वी तक्रारदार यांनी आलोसे खुपीया अंमलदार देशमुख यांना भेटी संबंधाने विचारणा करावी, असे सांगीतले असता तक्रारदार शुभम भगवान थिटे यांनी आम्हा सर्वाच्या समक्ष आलोसे खुपीया अंमलदार देशमुख यांना फोन करुन मोबाईल फोन चा स्पिकर सुरु केला असता आलोसे खुपीया अंमलदार देशमुख यांनी तक्रारदार यांना फोनवर सांगीतले की, ठाणेदार दराडे यांना विचारुन सांगतो व तक्रारदार यांना फोन करतो. असे बोलणे आम्ही दोन्ही पंचानी ऐकले. त्यानंतर तक्रारदार यांना आलोसे खुपीया अंमलदार देशमुख यांच्या फोनची वाट पाहण्यास सांगीतले. त्यानंतर बराचा वेळ आलोसे खुपीया अंमलदार देशमुख यांचा फोन न आल्याने तक्रारदार यांनी आलोसे खुपीया अंमलदार देशमुख यांना परत फोन लावुन मोबाईलचा स्पिकर सुरु केला असता आलोसे खुपीया अंमलदार देशमुख यांनी ठाणेदार दराडे हे आज अमरावती येथे गेले असुन ते दिनांक १५/०८/२०२६ रोजी येणार आहेत, त्यामुळे तक्रारदार यांनी दिनांक १५/०८/२०२६ रोजी भेटीसाठी यावे असे सांगीतल्याचे आम्ही दोन्ही पंचांनी स्पष्ट ऐकले. त्यावरुन पडताळणी कारवाई क.०२ हि दिनांक १५/०८/२०२६ रोजी पोलीस स्टेशन चान्नी जि. अकोला येथे करण्याचे सर्वानुमते ठरले आहे. दिनांक १५/०८/२०२६ रोजी सुकळी ते चान्नी रोड वरील कॅनोल जवळ ठरल्याप्रमाणे हजर येवुन मी तक्रारदार व पंच क्रं . १ यांना दि.१२/०८/२०२६ रोजीचे पडताळणी पंचनाम्यानुसार दिलेल्या सुचनाची उजळणी

POLICE STATION, CHANNI
सत्यमेव जयते
DIST. AKOLA



करून दिली. तक्रारदार हे त्यांच्या खाजगी चारचाकी ने सुकळी ते चान्नी रोडवर कॅनोल जवळुन रवाना होतील. व पंच क्र . २ व पोलीस स्टाफ हे सुकळी ते चान्नी रोड वर कॅनोल जवळ थांबुन राहतील. तक्रारदार व पंच क्र.१ यांना पोलीस स्टेशन चान्नी जि. अकोला येथे तक्रारदार यांचे सोबत तक्रारदार यांच्या खाजगी चारचाकी ने या ठिकाणा वरून ठाणेदार दराडे व आलोसे खुपीया देशमुख दोन्ही पोलीस स्टेशन चान्नी जि. अकोला यांचे भेटी करीता रवाना करण्यात येत आहे. ठाणेदार दराडे व आलोसे खुपीया देशमुख दोन्ही पोलीस स्टेशन चान्नी जि.अकोला यांचे सोबत भेट झाल्यानंतर त्यांचे सोबत कामा संबंधाने बोलणी करुन लाप्रवि पथक थांबुन असलेल्या ठिकाणी परत यावे. असे सांगीतले. त्यानंतर यांचे सुचने प्रमाणे पोहवा. विनोद मारकंडे यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरु करून कापडी पिशवी मध्ये रेकॉर्डर टाकून कापडी पिशवी तक्रारदाराचे शर्टाचे आतील बाजुस पिन करुन अटकवून दिल्या नंतर तक्रारदार व पंच क्र.१ यांना तक्रारदार यांच्या खाजगी चारचाकी ने ठाणेदार दराडे व आलोसे खुपीया देशमुख यांची भेट घेणेकामी पोलीस स्टेशन चान्नी जि.अकोला येथे ११.५५ वा. सुमारास रवाना केले. मी, पंच क्र.२ व लाप्रवि स्टाफ असे ग्राम सुकळी ते चान्नी रोड वरील कॅनोल जवळ थांबून राहिलो. १२.२०वा. चे दरम्यान तक्रारदार शुभम भगवान थिटे वय ३० वर्षे काम शेतीपत्ता-मुपो मळसुर ता. पातुर जि.अकोला व पंच क्र.१ हे तक्रारदार यांच्या खाजगी चारचाकी वाहन ने ग्राम सुकळी ते चान्नी येथील कॅनोल जवळ परत आले असता, माझें सुचनेप्रमाणे पोहवा विनोद मारकंडे यांनी तक्रारदाराकडील व्हॉईस रेकॉर्डर घेवून बंद केला. व्हॉईस रेकॉर्डर माझे कडे दिला. मी पंच क्र.१ यांना पंच क्र.२ समक्ष घडलेल्या घटने बाबत विचारणा केली असतापंच क्र. ०१ यांनी पंच क्र.०२ समक्ष कळविले की, मी व तक्रारदार असे तक्रारदार यांच्या खाजगी चारचाकी वाहन ने पोलीस स्टेशन चान्नी जि. अकोला येथे ठाणेदार दराडे व गै.अर्जदार पोलीस अंमलदार देशमुख, यांना भेटण्यासाठी गेलो असता, तक्रारदार हे पोलीस स्टेशन चान्नी येथे गेले, मी त्यांचे पाठोपाठ जावुन त्यांचेवर लक्ष ठेवुन होतो. तक्रारदार हे पोलीस स्टेशन मध्ये जावुन तेथील पोलीसांना विचारणा करुन आलोसे खुपीया देशमुख यांना भेटून बोलणी केली त्यामध्ये कामासंबंधी बोलणी करुन संभाषण केले. त्यानुसार पडताळणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार व आलोसे खुपीया देशमुख यांचेत झालेल्या संभाषणानुसार आलोसे खुपीया देशमुख यांनी तक्रारदार यांना वाईन बारच्या NOC देण्यासाठी लाचरक्कम मागणीचे बोलणे करुन ६५,००० रुपया ऐवजी ३०,००० रुपयामध्ये साहेबाकडुन फायनल करून घेतो. असे म्हणुन साहेबासाठी ३०,००० रुपयाची मागणी केली. नंतर फायनल झाल्यावर सांगतो. आलोसे खुपीया देशमुख यांनी तक्रारदार यांना साहेबांना बोलणी केल्यावर फायनल झाल्यावर सांगतो असे म्हटल्यान त्यांनी लाच मागणी संबंधाने फायनल केले नाही. साहेबाला बोलतो फायनल झाल्यावर सांगतो असे निष्पन्न झाले आहे. यावरुन आलोसे खुपीया देशमुख यांनी साहेबांसाठी लाच मागणी केली आहे. परंतु लाचरक्कम किती याबाबत स्पष्ट ठरले नसल्याने आलोसे खुपीया देशमुख व ठाणेदार दराडे यांची परत पडताळणी दिनांक १७/०८/२०२६ रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले आहे. दि.१५.०८.२०२६ रोजीच्या पडताळणी करवाईतील दिलेल्या सुचने वरुन दिनांक १७/०८/२०२६ रोजी आम्ही, दोन्ही पंच व स्टाफ सह ०८.३० वा. अॅ.क.ब्यु. कार्यालय वाशिम येथुन रवाना होवुन पातुर येथे पाेहचुन तक्रारदार श्री.शुभम थिटे यांना आलोसे खुपीया देशमुख यांना फोन लावुन कुठे भेटायचे अशी विचारणा करण्याचे सांगीतले असता तक्रारदार यांनी आलोसे खुपीया देशमुख हे आज ग्राम मळसुर येथे तक्रारदार यांच्या गावातील श्री. सोपीनाथ महाराज संस्थान येथील नागपंचमीच्या बंदोबस्तात असल्याने ते तक्रारदार यांना त्यांचे त्यांच्या बियर शॉपीवर येवुन भेटणार आहे, असे सांगुन तक्रारदार यांनी आम्हाला ग्राम मळसुर येथे तक्रारदार यांच्या घरी येण्याची विनंती केली. तक्रारदार यांच्या विनंती वरुन आम्हा सर्वानुमते ग्राम मळसुर जाण्याचे ठरले. आम्ही सर्व ग्राम मळसुर येथील तकारदार श्री. शुभम थिटे यांच्या राहते घरी पडताळणी व सापळाकामी लागणारे साहित्यानिशी हजर आलो. १९.०३ वा चे दरम्यान मी तक्रारदार यांना पंचा समक्ष गै. अर्जदार यांना फोन करुन कधी येता अशी विचारणा करण्यासाठी स्पिकर फोन लावण्याची सुचना दिल्याने तक्रारदार यांनी आम्हा पंचा समक्ष आलोसे खुपीया देशमुख यांना फोन लावला सदर फोन रेकॉर्डीग मेमरी कार्डचे फोल्डर क.१ मध्ये करण्यात आली आहे. त्यानुसार आलोसे खुपीया देशमुख यांनी तक्रारदार यांना ग्राम मळसुर येथील मंदिराच्या कमानी जवळ येण्याचे सांगीतल्याने माझे सुचने वरुन मेमरी कार्ड मध्ये फोल्डर क्र . २ तयार करुन व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून कापडी पिशवी मध्ये रेकॉर्डर टाकून कापडी पिशवी तक्रारदाराचे शर्टाचे आतील बाजुस पिन करुन अटकवून दिल्यानंतर तक्रारदार व पंच क्र.१ यांना तक्रारदार यांच्या खाजगी दुचाकी ने आलोसे खुपीया देशमुख यांची भेट घेणेकामी मळसुर येथे १९.०९ वा. सुमारास रवाना केले. मी, पंच क्र.२ व लाप्रवि स्टाफ असे तक्रारदार यांचे राहते घरी थांबून राहिलो. १९.२३ वा. चे दरम्यान तक्रारदार शुभम भगवान थिटे वय ३० वर्षे काम शेतीपत्ता-मुपो मळसुर ता. पातुर जि. अकोला व पंच क्र.१ हे परत आले असता, माझे यांचे सुचने प्रमाणे पोहवा विनोद मारकंडे यांनी तक्रारदारा कडील व्हॉईस रेकॉर्डर घेवून बंद केला. व्हॉईस रेकॉर्डर पोलीस निरीक्षक, सुलभा राऊत, लाप्रवि वाशिम यांचे कडे दिला. मी पंच क्र.१ यांना पंच क्र.२ समक्ष घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता पंच क्र .०१ यांनी पंच क्र.०२ समक्ष कळविले की, तक्रारदार

यांनी आलोसे खुपीया देशमुख यांना भेटुन संभाषण केले की, तक्रारदार कमानजवळ आहोना. हो. तुम्ही कुठे आहा याना ईकडे सरा दांगडो सकाळपासुन हेच चालु आहे. त्यावर आलोसे खुपीया देशमुख म्हणाले काय कराव. तुम्हाले येतो येतो म्हणुन राहिलो. पण अतीच आहो. कुठच गेलो नाही मी.. त्यावर तक्रारदार म्हणाले ह.. ह. त्यावर आलोसे खुपीया देशमुख म्हणाले काहीच नाही आता. तुम्ही काहीच करू नका. मी सांगीतलं... साहेबाले.. मीया म्हटल बा. ते.. शुभम आले होते. त्या दिवशी आले होते ते. आले होते डब्बल मायाजवळ म्हटल साहेब आता काही तानवु नका ? त्यायच जावुदया तुमचं जावुदया त्यान तिस मले सांगीतल. त्यावर तक्रारदार म्हणाले तीस हजार तिस हजार ह.. तुम्ही सांगीतल.. त्यावर आलोसे खुपीया देशमुख म्हणाले साहेब म्हणत ठिक आहे. काही हरकत नाही. फक्त मले. त्यावर तक्रारदार म्हणाले तुमच सांगुन दया मले काय करा लागते. त्यावर आलोसे खुपीया देशमुख म्हणाले काही नाही दादा मी तुमचा एक काका म्हणा. काका म्हणा. काही हरकत नाही. मला फक्त पाच हजार देवुन दया. त्यावर तक्रारदार म्हणाले ठिक आहे. काहि विषय नाही. त्यावर आलोसे खुपीया देशमुख म्हणाले अन तुम्ही उदया दहा वाजता या. घेवुन जा बयान. त्यावर तक्रारदार म्हणाले ठिक आहे ना.. त्यावर आलोसे खुपीया देशमुख म्हणाले मि आज रात्रीतुन तयार करतो. त्यावर तक्रारदार म्हणाले चालते.. फालतु तानविण्यात काही अथ नाही ना◌ा.. त्यावर आलोसे खुपीया देशमुख म्हणाले रेंगाळत काही ठेवु नाही ना.. त्यावर तक्रारदार म्हणाले साहेबाले भेटाच काही काम नाही. त्यावर आलोसे खुपीया देशमुख म्हणाले काहीच काम नाही. तुमची मनाची काही समाधानी करायची असेल तर तुम्ही भेटु शकता. त्यावर तक्रारदार म्हणाले नाही. नाही जर तुम्ही असाल तर.. नाही तर काही काम नाही आपल्याले. तुम्ही बोललेना विषय संपला. त्यावर आलोसे खुपीया देशमुख म्हणाले आपल शुभम भाउ.. माझ लपुन काहीच नाही. त्यावर तक्रारदार म्हणाले ह. हं. हं. त्यावर आलोसे खुपीया देशमुख म्हणाले लपुन काही बी नाही. शुभमन पंचविस सांगीतले साहेब मी पाच ठेवतो. हे नाही. हे आजीबात नाही. तुम्ही मले ते सांगीतले तोच आकडा साहेबाला सांगीतला. त्यावर तक्रारदार म्हणाले चालते ना.. त्यावर आलोसे खुपीया देशमुख म्हणाले लपुन किंवा चोरून काहीही नाही. एक शब्दही नाही. त्यावर तक्रारदार म्हणाले चालतेना त्यावर आलोसे खुपीया देशमुख म्हणाले एक शब्दहीनाही आणि पाच पैसेही ईकडे तिकडे नाही. त्यावर तक्रारदार म्हणाले नाही नाही तो काही विषय नाही. चालते मगं.. त्यावर आलोसे खुपीया देशमुख म्हणाले बरं ठिक आहे. त्यावर तक्रारदार म्हणाले सकाळी येतो अकरा वाजता.. त्यावर आलोसे खुपीया देशमुख म्हणाले दहा वाजताच या... त्यावर तक्रारदार म्हणाले ठिक आहे.. व इतर व्यक्तीसोबत ठिक आहे काही नाही हेच यात्रा त्यावर आलोसे खुपीया देशमुख म्हणाले तुम्ही मले एक व्हाटसअप वर पाठवल होत बाईचा त्यावर तक्रारदार म्हणाले ह. ह. ति झरॉक्स आणुन त्यावर आलोसे खुपीया देशमुख म्हणाले ह ह. त्यावर तक्रारदार म्हणाले ठिक आहे.त्यानंतर मी तक्रारदार यांना व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन पंच क्र .०१ यांचे सह गै. अर्जदारांच्या भेटी करीता रवाना केल्या पासुन ते परत येई पर्यंत काय झाले? याबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी पंच क्र.०१ यांनी सांगीतल्याप्रमाणे वरील प्रामणे हकीकत सांगीतली.एकदंरीत सदर पडताळणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार व लोकसेवक महादेव मधुकरराव देशमुख वय-५७ वर्षे, पद- ग्रेड पोलीस उप निरीक्षक, पोस्टे चान्नी जि. अकोला यांचेत झालेल्या संभाषणा नुसार लोकसेवक महादेव मधुकरराव देशमुख यांनी तक्रारदार यांना वाईन बारच्या NOC देण्यासाठी लाचरक्कम मागणीचे बोलणे करुन ३०,००० रुपये ठाणेदार साहेबासाठी व ५,००० रुपये लोकसेवक महादेव मधुकरराव देशमुख यांनी स्वतःसाठी मागणी करुनर लाच रक्कम दिनांक १८/०८/२०२६ रोजीचे सकाळी १०.०० वाजता पोलीस स्टेशन चान्नी जि. अकोला येथे स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे सापळा कारवाई दिनांक १८/०८/२०२६ रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले आहे.दिनांक १८/०८/२०२६ रोजी आम्हा, पंच व स्टाफला पडताळणी कारवाई दरम्यान ठरल्याप्रमाणे पोलीस स्टेशन चान्नी जि. अकोला येथे जावुन सापळा कारवाई आजमावयाची असल्याचे सांगुन आम्ही सर्व वाशिम येथुन शासकिय वाहन क्र . एम.एच. ३७ ए.एच. ३९५९ ने रवाना होवुन ग्राम सुकळी ते चान्नी रोड वरील कॅनोल जवळ अंदाजे ०९.४० वा सापळाकामी लागणारे साहित्यानिशी हजर आलो. तक्रारदार हे त्यांच्या खाजगी चारचाकी वाहनाने ठरल्याप्रमाणे तेथे आमच्या अगोदर हजर होते.मी सापळा कारवाई करीता हजर असलेल्या सर्वांना सुचना देवुन तकारदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या सापळापुर्व पंचनाम्याचा उददेश समजावुन सांगीतला. त्यानंतर पंचांना व तक्रादार श्री.शुभम थिटे यांना सापळापुर्व पंचनामा कारवाई सुरु करुन सर्व सुचना देवुन तक्रारदार यांना लाच मागणी केलेले ३५००० रुपये हजर करण्यास सांगीतले असता तक्रारदार यांनी माझे समोर ५०० रुपये दराच्या एकुण ७० नोटा असे एकुण ३५,००० रुपये हजर केले. तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांना अ◌ॅन्थ्रासिन पावडर लावण्यात येणार असुन अ◌ॅन्थ्रॉसिन पावडर व अल्ट्राव्हायोलेट लॅम्पचे गुणधर्माची माहिती देवुन नोटांना अ◌ॅन्थ्रासिन पावडर लावण्यात आली व पावडर लावलेल्या नोटा तक्रारदार यांच पॅन्टच्या खिशात ठेवून त्यांना सुचना देण्यात आल्या. मी सांगीतल्याप्रमाणे पोहवा विनोद मारकंडे यांनी १०.१९ वा चे सुमारास व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार यांचे शर्टचे आतिल बनियानला टाचपीनच्या मदतीने लावुन दिला. तक्रारदार व पंच क्र .१ असे पोलीस स्टेशन चान्नी येथे

पोहचणे पुर्वी पोलीस निरीक्षक, सुलभा राऊत, पंच क्र. २ व लाप्रवि स्टाफ असे तेथे पोहचुन स्टाफसह सापळा कार्यवाहीचे आयोजन केले. पोलीस स्टेशन चान्नी परिसरात आजुबाजुला सापळा लावुन थांबुन राहिलो.तक्रारदार हे पोलीस स्टेशन चान्नी च्या आत गेले पाठीमागे पंच क्र .१ हे पोलीस स्टेशन चान्नीच्या आवारात जावुन थांबुन होते. सापळा पथक आजुबाजुने दबा धरुन थांबुन होतो. काळी वेळाने तक्रारदार यांनी पोलीस स्टेशन च्या इमारत बाहेर येवुन त्यांच्या शेंडीवरुन हात फिरवून लाच घेण्याचा पुर्व नियोजीत इशार १०. ३७ वा चे सुमारास दिला. खुपीया अंमलदार देशमुख यांना मी लाप्रवि स्टाफ च्या मदतीने ताब्यात घेतले. पोहवा/विनोद मारकंडे यांनी तक्रारदार यांच्या कडुन व्हाईस रेकॉर्डर बंद करुन माझे यांचे ताब्यात दिले. लोकसेवक महादेव मधुकरराव देशमुख, वय-५७ वर्षे, पद- ग्रेड पोलीस उप निरीक्षक, रा.ह.मु. बाजोरीया नगर, हिंगणा रोड अकोला, मुळ रा. पिंपळखुटा ता.पातुर जि. अकोला यांनी तक्रारदार यांचेकडुन अंदाजे १०:३७ वाजताचे सुमारास ३५,०००/- रुपये लाच म्हणुन स्विकारले वरुन त्यांना ३५,०००/रू लाच रक्कमेसह ताब्यात घेवुन त्यांच्या कडुन लाच रक्कम हस्तगत केल व त्यांना ताब्यात घेतले. लोकसेवक महादेव मधुकरराव देशमुख, वय-५७ वर्षे, पद- ग्रेड पोलीस उप निरीक्षक, रा.ह.मु. बाजोरीया नगर, हिंगणा रोड अकोला, मुळ रा. पिंपळखुटा ता.पातुर जि. अकोला यांनी तक्रारदार यांचे वाईन बार च्या एन ओ सी देण्याकरीता दि. १२/०८/२०२६, दि.१५/०८/२०२६ व दि.१७/०८/२०२६ रोजीच्या पडताळणी कारवाई दरम्यान ३०,०००/- रुपये लाच रक्कम ठाणेदार करीता व ५,००० रुपये लाच रक्कम स्वतः करीता स्पष्ट मागणी करुन दि. १८/०८/२०२६ रोजी सापळा कारवाई १०:१९ वा. ते १०:३७ वा. दरम्यान ३५,०००/- रू लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली. त्यांचे हे कृत्य कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे होत असल्याने माझी त्यांचे विरुध्द सरकारतर्फे कायदेशिर फिर्याद आहे

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Gangadhar Sheshrao Darade(I (Inspector)) / psi **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-यांची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Gangadhar Shesher

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): psi

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):